# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:27.11.2025** **वार:गुरुवार**

1. पुण्यातल्या खडकवासला ते खराडी आणि नळ स्टॉप ते माणिक बाग या नव्या मेट्रो मार्गांना केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी
2. राज्य सरकारकडून शेतीशी निगडीत कर्जवसुलीला एक वर्षाची स्थगिती, शेती कर्जाचं होणार पुनर्गठन
3. संविधान दिन संपूर्ण राज्यात उत्साहात साजरा
4. महानगरपालिका निवडणुकीसाठी अंतिम मतदारयाद्या प्रसारित करण्याला मुदतवाढ आणि
5. दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या गुवाहाटी क्रिकेट कसोटीत भारताचा 408 धावांनी पराभव

**मंत्रीमंडळ निर्णय-पुणे मेट्रो**

पुण्यातल्या खडकवासला ते खराडी आणि नळ स्टॉप ते माणिकबागेदरम्यानच्या नव्या मेट्रो मार्गांना तसंच बदलापूर आणि कर्जत दरम्यानच्या अतिरिक्त रेल्वेमार्गाला केंद्रीय मंत्रीमंडळानं काल मंजुरी दिली. केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्रि अश्विनी वैष्णव यांनी दिल्लीत पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. पुण्यातल्या 4 आणि 4 ए या नव्या मार्गिकांसाठी 9 हजार 858 कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. येत्या 5 वर्षात हे मार्ग पूर्ण करण्याचं उद्दिष्ट असून त्यानंतर पुण्यातल्या मेट्रो मार्गांची लांबी 100 किलोमीटर पेक्षा जास्त होईल. या निर्णयाबद्दल केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानले आहेत. याबाबत पुण्यात माध्यमांशी बोलताना मोहोळ म्हणाले......

**गेले काही दिवस ज्या दोन मेट्रो मार्गाची प्रतीक्षा पुणेकरांना होती त्या खराडी ते खडकवासला नळस्टॉप ते वारजे माणिकबाग या जवळपास एकतीस पॉइंट सहा किलोमीटरच्या मेट्रो मार्गाला आज केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी मिळाली. माननीय मोदीजींचे माननीय देवेंद्रजींचे मी पुणेकरांच्या वतीनं या ठिकाणी मनापासून धन्यवाद व्यक्त करतो. पुण्याची मेट्रोची जी काही व्यवस्था आहे खर तर मोदीजी पुण्यातल्या मेट्रोचं भूमिपूजन केलं, आणि आता टप्प्याटप्प्याने या मेट्रो मार्गाचं उद्घाटन होतंय जवळपास बत्तीस किलोमीटरची मेट्रो मार्ग आता सुरू आहे. त्यात पुन्हा स्वारगेट ते कात्रज या भुयारी मेट्रो मार्गाचं काम सुरू होत आहे हिंजवडी ते शिवाजीनगर या मेट्रो मार्गाचं काही दिवसात उद्घाटन होत आहे. आता त्यात अधिकच्या या एकतीस पॉइंट सहा किलोमीटरचं नव्यानं नेटवर्क तयार होईल. जवळपास नऊ हजार आठ सत्तावन्न कोटी रुपयांचा हे दोन्ही प्रकल्प ज्याला आज केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिली हे पाच वर्षामध्ये पुढच्या हे प्रकल्प पूर्ण करण्याचं उद्दिष्ट राहील आणि म्हणून पुण्याची एकूणच वाहतुकीचा प्रश्न पाहता मागच्या काळात केंद्रीय मंत्रिमंडळानं केंद्र सरकारनं पुण्याला एक हजार ई बसेस सुद्धा मंजूर केल्या आज बत्तीस किलोमीटरचा नवीन मेट्रो मार्ग सुद्धा मंजूर केला हे पुणेकरांसाठी अत्यंत समाधानाची आणि आनंदाची ही बातमी आहे.**

बदलापूर-कर्जत दरम्यान 65 किलोमीटरच्या तिसऱ्या आणि चौथ्या रेल्वे मार्गिकेलाही केंद्रीय मंत्रीमंडळानं मंजुरी दिली. सव्वा तेराशे कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित असलेल्या या प्रकल्पाचा निम्मा खर्च राज्य सरकार उचलणार आहे. दुर्मिळ खनिजांपासून चुंबक उत्पादनाच्या योजनेलाही केंद्रीय मंत्रीमंडळानं काल मान्यता दिली.

**कर्जवसूली स्थगिती**

राज्यात यंदा जून ते सप्टेंबर महिन्यातील अतिवृष्टीमुळे निर्माण झालेल्या पूर परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने पुढच्या एक वर्षासाठी शेतीशी निगडीत कर्जाच्या वसुलीला स्थगिती देण्याचा निर्णय घेतला आहे. तसंच सर्व बाधित तालुक्यांच्या सर्व गावातील बाधीत शेतकऱ्यांच्या अल्पमुदत कर्जाचं मध्यम मुदत कर्जात रुपांतरण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

सहकार विभागाने यासंदर्भातील परिपत्रक जारी केलं आहे. राज्य सरकारने ऑक्टोबर महिन्यात 32 हजार कोटींचा विशेष मदतनिधी जाहीर केला होता; त्याचवेळी दुष्काळी उपाययोजना, सवलती लागू करण्याचा निर्णयही घेण्यात आला होता. या पार्श्वभूमीवर कर्ज पुनर्गठन आणि वर्षभरासाठी शेतीशी निगडीत कर्जाच्या वसुलीला स्थगिती देण्यात आली आहे.

**मुंबई 26/11**

26 अकराच्या मुंबई दहशतवादी हल्ल्याला काल 17 वर्ष पूर्ण झाली. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी या हल्ल्यातल्या शहीदांना श्रद्धांजली वाहिली. संरक्षण मंत्री राजनाथ सिंग, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनीही मुंबई हल्ल्यातल्या शहीदांना आणि बळी पडलेल्या नागरिकांना श्रद्धांजली अर्पण केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही या दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या पोलीस दलातील अधिकारी, कर्मचारी तसंच सुरक्षा दलातील अधिकाऱ्यांना काल आदरांजली वाहिली. मुंबई पोलीस आयुक्त कार्यालयातील स्मृती स्मारकाला पुष्पचक्र अर्पण करून त्यांनी अभिवादन केलं. यावेळी फडणवीस यांनी शहिदांच्या कुटुंबीयांची भेट घेत आपल्या संवेदना व्यक्त केल्या. राज्यातही विविध ठिकाणी काल 26 अकराच्या मुंबई दहशतवादी हल्ल्यातील शहीदांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

**संविधान दिन**

संपूर्ण देशभरात काल संविधान दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त विविध उपक्रमांचं आयोजन करण्यात आलं होतं. दिल्लीमध्ये संसदेत झालेल्या कार्यक्रमात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या नेतृत्वात संविधानाच्या उद्देशिकेचं वाचन करण्यात आलं. यावेळी उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन, पंतप्रधान नरेंद्र मोदी, लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला, विरोधी पक्षनेते राहुल गांधी, मल्लिकार्जुन खर्गे उपस्थित होते. राज्यातही संविधान दिनानिमित्त काल विविध कार्यक्रम झाले. ऐकुया याबाबतचा वृत्तांत आमच्या प्रतिनधीकडून......

**26 नोव्हेंबर 1949 मध्ये भारतीय संविधानसभेने भारताची राज्यघटना स्विकारली. 26 जानेवारी 1950 रोजी ही राज्यघटना पूर्णपणे लागू करण्यात आली. संविधान लागू करण्याचा उद्देश काय याची माहिती आणि जनजागृती करण्याच्या दृष्टीने प्रत्येक वर्षी 26 नोव्हेंबर रोजी संविधान दिन साजरा करण्यात येतो. हमारा संविधान हमारा स्वाभिमान अशी यावर्षीच्यासंविधान दिनाची मध्यवर्ती संकल्पना आहे. भारतीय संविधान अमृत महोत्सवीवर्षानिमित्त 26 नोव्हेंबर 2025 ते 26 जानेवारी 2026 दरम्यान सामाजिक न्यायविभागाच्या वतीने 'घर घर संविधान' हे अभियानदेखील राबविण्यात येत आहे. मुंबईत राजभवन आणि दिल्लीमध्ये महाराष्ट्र सदनात प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन करून लोकशाही मूल्य, कर्तव्यनिष्ठा आणि संविधानाबद्दल आदर व्यक्त करत संविधान दिन साजरा करण्यात आला. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्यावतीने संविधान पदयात्रा दिंडीचे आयोजन करण्यात आलं होतं. पुण्यात ढोल-ताशांच्या गजरात संविधानाचे प्रास्ताविक 'संविधान रथात' ठेऊन महानगरपालिका ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्या पर्यंत भव्य मिरवणूक काढण्यात आली. धुळ्यात लोकशाही, समानता, बंधुता आणि सामाजिक न्याय या मूलभूत तत्त्वांचे पालन करण्याची शपथ घेण्यात आली. नांदेड, सांगली, सोलापूर, हिंगोली, लातूर, नाशिक, कोल्हापूर आदी ठिकाणी संविधान दिनानिमित्त संविधान उद्देशिकेचे सामूहिक वाचन तसच रॅली काढण्यात आली होती. बहुतांश ठिकाणी प्रभात फेरी, घोषवाक्य स्पर्धा, विविध स्पर्धा, देशभक्तीपर गीते, चित्ररथ यांचं आयोजन करण्यात आलं होतं. छत्रपती संभाजीनगर इथं विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या हस्ते संविधान प्रस्ताविका कोनशिलाचे अनावरण दूरस्थ पद्धतीने करण्यात आलं. आकाशवाणीच्या बातम्यांसाठी आमच्या ठीकठिकाणच्या वार्ताहरांसह प्रशांत जाधव पुणे.**

**हरकती सूचना**

राज्यातील महानगरपालिका निवडणुकीसाठी प्रारूप मतदार यादीवर हरकती आणि सूचना दाखल करणं, तसंच अंतिम मतदारयाद्या प्रसिद्ध करण्याला मुदतवाढ देण्यात आली आहे. यानुसार प्रारूप मतदार यादीवर हरकती आणि सूचना दाखल करण्याची अंतिम मुदत 27 नोव्हेंबर ऐवजी 3 डिसेंबर, हरकतीवर निर्णय घेऊन प्रभागनिहाय अंतिम मतदार याद्या अधिप्रमाणित करुन प्रसिध्द करण्याची मुदत 5 डिसेंबर ऐवजी 10 डिसेंबर, मतदान केंद्रांच्या ठिकाणांची यादी प्रसिध्द करण्याची मुदत 8

डिसेंबर ऐवजी 15 डिसेंबर आणि मतदान केंद्रनिहाय मतदार यादी प्रसिध्द करण्याची मुदत 12 डिसेंबर ऐवजी 22 डिसेंबरपर्यंत वाढवण्यात आली आहे.

**आयआयटी बॉम्बे**

मुंबईतल्या आयआयटीच्या नावातून बॉम्बे हे नाव काढून मुंबई आणावं यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांना पत्र लिहून मागणी करणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल नागपुरात वार्ताहरांशी बोलताना दिली. केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंग यांनी आयआयटीच्या नावात बॉम्बे असल्याबद्दल समाधान व्यक्त केलं होतं. त्यावरुन मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी टीका केली होती. या प्रकरणानंतर मुख्यमंत्री बोलत होते.

**चंपाषष्ठी**

चंपाषष्ठीचा सण काल राज्यात सर्वत्र उत्साहात साजरा करण्यात आला. जेजूरी इथं गेले सहा दिवस सुरू असलेल्या चंपाषष्ठी उत्सवाची काल सांगता झाली. यावेळी हजारो भाविकांनी भंडाऱ्याची उधळण करत येळकोट येळकोट जय मल्हार असा गजर केला.

**खेलो इंडिया**

राजस्थानमध्ये सुरू असलेल्या पाचव्या खेलो इंडिया विद्यापीठस्तरीय स्पर्धेत राज्यातले खेळाडू चमकदार कामगिरी करत आहेत. आहिल्यानगरमधील पाथर्डी  तालुक्यातील संजय लोखंडे याने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचं प्रतिनिधित्व करताना 65 किलो वजन गटात एकंदर 244 किलो वजन उचलून सुवर्ण पदक पटकावलं. पुरुषांच्या 50 मीटर फ्रीस्टाइल प्रकारात पुणे विद्यापीठाच्या साहिल पवारने रौप्यटपदक पटकावलं. मुंबई विद्यापीठाच्या जलतरणपटूंनी फ्रीस्टाईल रिले स्पर्धेत कास्य पदक जिंकलं. मुंबई विद्यापीठाच्याच दीपक पाटील यांने जलतरणात रौप्यपदक मिळवलं.

**क्रिकेट**

गुवाहाटी इथं झालेल्या दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या दुसऱ्या आणि अंतिम कसोटी सामन्यात काल भारताचा पराभव झाला. दक्षिण आफ्रिकेनं हा सामना 408 धावांनी जिंकला. या पराभवाबरोबरच भारताने ही मालिकाही 2 शून्य अशी गमावली आहे. काल पाचव्या दिवशी 2 बाद 27 वरून सुरु झालेला भारताचा डाव अवघा 140 धावांत आटोपला. या पराभवानंतर कसोटी क्रिकेट क्रमवारीत भारताची घसरण झाली असून तो आता पाचव्या स्थानावर आहे.

**हवामान**

येत्या 24 तासात राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहील असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**